दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४१ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२० फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# बाबांनी आमच्या पंखांना बळ दिलं ;वडिलांच्या आठवणीने अभिनेता रितेशचा कंठ दाटून आला

## लातूरात विलासराव देशमुख यांच्या पुतळ्याचे अनावरण



**लातूर–**माजी मुख्यमंत्री, दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आज लातूरमध्ये झाले. यावेळी विलास कारखाना परिसरात आयोजित सोहळ्यात बोलताना विलासराव देशमुख यांचे पुत्र आणि आणि अभिनेता रितेशचा वडिलांच्या आठवणीने कंठ दाटून आला.बाबांच्या आठवणींना उजाळा देतांना रितेश म्हणाला की, बाबांनी आम्हाला कधीही बंधनं घातली नाही. मुलांना जे करायचे ते त्यांनी करू दिले, कधीही रोखले नाही. वडील म्हणून हे कर ते कर असे त्यांनी कधीही त्यांनी बंधन लावले. मुलांवर कधीही कुठल्याही गोष्टीचा दबाव आणला नाही. मुलांच्या भरारीसाठी आपण ताकद देऊ अशीच भूमिका त्यांची राहीली. त्यामुळेच आम्ही घडलो. यावेळी बोलताना रितेशने जोरदार राजकीय टोलेबाजीही लगावली.रितेश देशमुखमने म्हटलं की, आजकाल राजकारणामध्ये कुठल्या-कुठल्या पातळीला भाषण जातात हे पाहून दु:ख होतं, जो महाराष्ट्र एकेकाळी दिग्गज नेते त्याच्या भाषणांना गाजवला, तो काळ आता दिसत नाही. भावा-भावांचं प्रेम विलासराव साहेब आणि दिलीपराव साहेबांनी शिकवलं. काका आणि पुतण्यामधील प्रेम कसं असावं याचं हे उत्तम उदाहरण आहे.आज साहेबांना जाऊन जवळपास १२ वर्ष झाली. थोडी फार उणीव नेहमीच भासते, पण ही उणीव आपल्याला कधी भासू नये म्हणून काका नेहमी मागे उभे राहिले. याच्यासाठी उभे राहिले की, आपल्या मुलाला गरज असली तरी मी आहे आणि नसली तरीही मी आहे. काकांना बऱ्याच वेळेस बोलता आलं नाही. पण, आज मी सर्वांसमोर सांगतो, काका मी तुमच्यावर प्रचंड प्रेम करतो, असं म्हणत रितेशने दिलीपराव देशमुख यांच्यासमोर आपल्या भावना आणि प्रेम व्यक्त केलं. काका आणि पुतण्याचं प्रेम कसं असलं पाहिजे याचं ज्वलंत उदाहरण आज या स्टेजवर आहे, असंही रितेश देशमुख म्हणाला.अमित देशमुख यांनी यावेळी भाषणात म्हटलं की, विलासराव देशमुख यांचे नाव आठवलं तर निष्ठा हे समीकरण कायम आहे. ''मला तुम्ही काँग्रेसमधून काढून टाकलं तरी माझ्या रक्तातील काँग्रेस कशी काढणार, हे विलासराव देशमुख म्हणायचे. मला ही विचारात आहेत, मात्र मी जेथे आहे, तेथे ठीक आहे.समाजाची नाळ तोडून इकडे-तिकडे जाणं अपेक्षित नाही. सामान्य माणसाचा विश्वास संपादन करून सर्व जुन्या नेत्याचे दिवस पुन्हा आणू या. त्यासाठी सर्व सामान्य पर्यंत हे विचार पुन्हा पोहचविणे आवश्यक आहे.'' गांधी, पवार, ठाकरे यांच्याकडून सामान्य माणूस पाहात आहेत, त्यांच्याकडून जनतेला अपेक्षा आहेत. त्याची जबाबदारी आता येथील नेत्यावर आहे, असंही अमित देशमुख यांनी म्हटलं आहे.या भाषणात रितेश यांचा कंठ दाटून आला, डोळ्यात अश्रू आले. भाषण थांबले. त्यावेळी रितेश यांच्या आई वैशालीताई देशमुख यांचे डोळे पाणावले. बाजूला बंधू माजी मंत्री अमित देशमुख यांनी रितेश यांच्या पाठीवर हात ठेवत धीर दिला. त्यावेळी आई वैशालीताई आणि काका दिलीपराव देशमुख यांच्यासह मंचावर आणि उपस्थित अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

## काँग्रेसच्या दोन दिग्गज नेत्यांचा भाजपात प्रवेश



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील काँग्रेसच्या दोन दिग्गज नेत्यांचा दि. १९ फेब्रुवारी ला आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्या प्रमुख उपस्थितीत चिमूर येथील निवासस्थानी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

चिमूर तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विलास डांगे व नवेगाव पेठ येथील काँग्रेस नेते चरणदास कुमरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विकासाचा ध्यास असलेले राज्यातील नेतृत्व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्या कार्यक्षम, कणखर, कार्यकुशल नेतृत्वावर व त्यांच्या विकासकार्यावर तसेच कार्यकर्तृत्वावर प्रभावित होऊन भाजपात पक्षप्रवेश केला. यावेळी आमदार बंटीभाऊंनी त्यांच्या गळ्यात भाजपाचा दुपट्टा टाकून पक्षात सहर्ष स्वागत केले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या पक्षप्रवेशाप्रसंगी प्रामुख्याने भाजपा तालुकाध्यक्ष राजू पाटील झाडे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य वसंत वारजूकर, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष राजू देवतळे, भाजयुमो प्रदेश सचिव मनिष तुंम्पल्लीवार, भाजपा तालुका महामंत्री प्रशांत चिडे, भाजपा ज्येष्ठ नेते भिमराव ठावरी, भाजपा ज्येष्ठ नेते गिरीश भोपे, भाजपा ज्येष्ठ नेते घनश्याम डुकरे, भाजपा ज्येष्ठ नेते रमेश कंचर्लावार, भाजपा युवा नेते समीर राचलवार, सं.गां.नि.अ.यो. समिती अध्यक्ष संजय नवघडे, भाजपा नेते मोहन पिसे, भाजपा नेते योगेश नाकाडे, भाजपा नेते विलास कोराम, भाजयुमो शहर महामंत्री श्रेयश लाखे, भाजपा युवा नेते सागर भागवतकर भाजपा शहर उपाध्यक्ष फारुख शेख सरपंच ग्रामपंचायत कवडशी डाग, शुभम ठाकरे, सुरेंद्र झाडे व अन्य भाजपा पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

## महानाट्यातून उलगडला 'बिरसा मुंडा' यांचा जीवनप्रवास ;झाडीपट्टी कलाकारांनी वेधले लक्ष



**गडचिरोली । प्रतिनिधी**

आदिवासी समाजक्रांतीचे जनक व आद्य क्रांतीकारक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिरसा मुंडा यांच्या जीवनप्रवासाचा उलगडा आज बिरसा मुंडा महानाट्यातून महासंस्कृती महोत्सवात सादर करण्यात आला. या महानाट्याचा प्रेक्षकांनी आनंद घेतला.

सांस्कृतिक कार्य संचालनालय व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पटांगणात सुरू असलेल्या पाच दिवसीय महासंस्कृती महोत्सवाच्या तीसऱ्या दिवशी बिरसा मुंडा हे महानाट्य सादर करण्यात आले.

यावेळी समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन मडावी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मस्तोळी, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेंद्र शेंडे, नायब तहसिलदार संगीता धकाते व ज्योती तायडे तसेच विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. बिरसा मुंडा यांच्या जीवनप्रवास सांगणाऱ्या या महानाट्याची निर्मिती लोकजागृती संस्था चंद्रपूर यांची होती. लेखन चुडाराम बल्लारपुरे यांचे तर दिग्दर्शन अनिरुद्ध वनकर यांचे होते. संगीत लोकेश दुर्गे, ईश्वर खोब्रागडे व चेतन रामटेके यांचे, नेपथ्य हरेंद्र आणि प्रकाश योजना सौरभ मेश्राम यांची होती. कलावंत निखिल मानकर, भारत रंगारी, संजीव रामटेके, रूपाली खोब्रागडे, राणी मेश्राम, प्रवीण भसारकर, जुगल गणवीर, विजय गुरुनुले, पिंटू खोब्रागडे, अमित दुर्गे, स्नेहल वाटगुरे, गुरु मोहुर्ले, मयूर मस्के, शुभम गुरनुले, अंकुश शेडमाके, किशोर सातपुते, अभिषेक मोहुर्ले, प्रियंका गेडाम, प्रवीणा लाडके, संजना येरमेकर या झाडीपट्टीच्या कलाकारांनी आपल्या अभिनयातून बिरसा मुंडा यांचे जीवनचरित्र साकारतांना प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

बिरसा मुंडा यांच्या बालपणापासून त्यांच्या जीवनाच्या अखेरपर्यंतचे क्षण महानाट्यातून साकारण्यात आले. त्यांचे बालपण, शिक्षण, आदिवासी समाजाला एकत्र करून उभारलेले 'उलगुलान' आंदोलन, सर्वसामान्य जनतेवरील अन्याय करणाऱ्या इंग्रज अधिकारी, ठेकेदार, जमीनदार, सावकार यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा, ब्रिटिश कायद्यांविरूद्ध विद्रोह व लढाई महानाट्यातून सादर करण्यात आले. रात्री उशीरापर्यंत चाललेल्या या महानाट्याला हौशी प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

## करंजी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरा



**वरोरा । प्रतिनिधी**


छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तालुक्यातील करंजी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली .या वेळी गावातील तरुणांनी फोटो व मूर्ती ला पुष्पहार अर्पण करून मसाला भाताचे वितरण करण्यात आले . जय भवानी जय शिवाजी च्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता . या कार्यक्रमाला पोलीस पाटील गणेश मुसळे , अक्षय कन्नोजवार,खुशाल कन्नोजवार,योगेश देठे,प्रेराज पारोधे,सुरज पारोधे,अतुल काळे,राहुल देठे,साहील खुसपुरे,नयन साठे,नितेश कष्टी, सतीश कन्नोजवार तसेच गावातील माजी सैनिक भारत पारोधे व गावकरी उपस्थित होते .

## भाजपा ओबीसी मोर्चाचे शिवरायांना वंदन



**पुलगाव–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, हिंदुसूर्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त टिळक चौक, पुलगाव येथे भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा तर्फे महाराजांना माल्यार्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळेस भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते, जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप बोरकुटे, जिल्हा सचिव राजेश गुप्ता, शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे, चंद्रशेखर बेले, रुपेश कडुकार, प्रशांत लोणकर, प्रफुल मंथनवार, प्रेमप्रकाश पाटणी, निरज खत्री, किशोर कल्पे, निसार अहमद, विजयराव भांडे व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## नर अस्वलाचा विहिरीत पडून मृत्यू



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथून जवळच असलेल्या पिंपळगाव शेत शिवारात नर अस्वलाचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सकाळी नऊ वाजता च्या सुमारास उघडकीस आली.

चिमूर वनपरिक्षेत्र नवतळा बिटात येत असलेल्या पिंपळगाव येथे दुबराज गुरपुडे यांच्या शेतात कठडे नसलेली विहीर आहे या विहिरीत रात्रीच्या सुमारास नर अस्वल पडलेली होती सोमवारी सकाळी हा शेतकरी शेतावर गेला असता त्याला विहिरीमध्ये अस्वल पडून असल्याचे दिसून आले त्यांनी याबाबतची माहिती वन विभागाला दिली वन विभागाने तात्काळ घटनास्थळ गाठले परंतु विहिरीतून काढण्या अगोदरच त्या अस्वालाचा मृत्यू झाला होता. हे अस्वल दोन ते अडीच वर्षाचे होते या अस्वलाला बाहेर काढून वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर देऊडकर तरुण पर्यावरणवादी मंडळाचे आमोद गौरकर यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला. शवविच्छेदनासाठी चिमूर येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात नेण्यात आले. यावेळी वनरक्षक गायकवाड सोनुले ,बुरले ,वन कर्मचारी प्रदीप ढोणे, डांगे, जग्गू लांजेवार ,सुनील लांजेवार उपस्थित होते.

## वाढोणा येथे शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा




**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथे राजे शिवछत्रपती संभाजी महाराज मंडळाच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती साजरी करण्यात आली.राजे शिवछत्रपती संभाजी महाराज मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर, ग्रामस्वच्छता, मॅरेथॉन स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.त्या स्पर्धेतील स्पर्धकांना आकर्षक बक्षीस मान्यवरच्या हस्ते वितरण करण्यात आले. आणि विशेष म्हणजे गरजू महिलांना साडीचे वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच देवेंद्र गेडाम, उद्घाटक म्हणून पत्रकार सुभाष गजभे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल डोर्लिकर, महाराष्ट्र राज्य शिक्षण कोषाध्यक्ष धनंजय बोरकर, शिक्षक रुपेश डोर्लिकर, उपसरपंच भगवान बनसोडे, मार्गदर्शक सिताराम बावनकर, आस्तिक मुंगमोडे,पोलीस पाटील लिपिता गुरनुले, त. मु. स अध्यक्ष होमदेव बोरकर, शिक्षक जीवन बोरकर, संगीता गहाणे, बंडूजी मस्के,ग्रा. प सदस्य प्रदीप येसनसुरे, वासुदेव मस्के आदी मान्य. उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आशिष मस्के, प्रास्ताविक हर्षद गोपाले, तर आभार भारत बोरकर यांनी मानले.

## बोगदा निर्मितीचे काम रखडल्याने तीन किमीचा फेरा



**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील रेल्वेलाइन खाली बोगदा निर्माण करण्याकरिता आर्वी मार्गावर असलेले रेल्वे गेट ९ महिन्यांपूर्वी बंद करण्यात आले होते. बोगदा निर्मितीचे काम बंद असल्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तीन किलोमीटरचा फेरा घेऊन शहरात यावे लागत आहे.

रेल्वेलाइनमुळे पुलगाव शहर दोन भागात विभागल्या गेले आहे. आर्वीकडे जाणाऱ्या मार्गावर शहरातील दखनी फैल, जोशी प्लॉट, वल्लभनगर, हिवरा, सोरटा, रसुलाबाद, विरूळ, रोहणा येथील रहिवाशांना प्रत्येक कामाकरिता रेल्वेलाइन ओलांडून शहरात यावे लागते. रेल्वे प्रशासनाने बोगदा निर्माण करण्यासाठी रेल्वे गेट ९ महिन्यापूर्वी बंद केले. मोठा गाजावाजा करीत बोगदा निर्मितीचे काम सुरू करण्यात आले. मात्र ९ महिन्यांचा कालावधी लोटला पण अद्यापही बोगदा तयार झाला नाही. आर्वी मार्गावरून होणारी वाहतूक सुरळीत राहावी याकरिता तीन किलोमीटर फेरा असलेला मार्ग वाहतुकीकरिता ठेवण्यात आला. वर्धा नदीच्या काठावरून रेल्वे पुलाखालून वाहनांना कृषी उत्पन्न बाजार समिती मार्गाने शहरात यावे लागते. या मार्गाची अवस्था अत्यंत गंभीर आहे. या मार्गावरील खड्ड्यांमुळे तेथून मार्गक्रमण करणे अत्यंत कठीण झाले आहे. नियमित प्रवास करणाऱ्या अनेक वाहनचालकांना वेगवेगळे आजार झाले आहेत. बोगद्याचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून मार्ग वाहतुकीकरिता खूला करा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सर्व भेदभावापासून मुक्तीचा आगाज!

**जागतिक सामाजिक न्याय दिन, दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, सामाजिक न्यायाचा प्रचार आणि जगभरातील गरिबी, असमानता आणि भेदभाव यासारख्या समस्यांचे निराकरण करण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो. सामाजिक न्याय हे एक मूलभूत तत्त्व आहे जे शांततापूर्ण आणि समृद्ध समाजांना आधार देते, जिथे प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, संधी आणि संसाधनांमध्ये प्रवेश असतो. जागतिक सामाजिक न्याय दिनाचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे, आव्हाने आणि अधिक समान आणि न्याय्य समाजाला चालना देण्यासाठी सामूहिक कृतीची अत्यावश्यक गरज यावविषयी सदर संकलित लेखातून माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी देताहेत... संपादक.**

वर्ल्ड डे ऑफ सोशल जस्टिस जागतिक स्तरावर २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. याची सुरुवात २००९मध्ये झाली. तेव्हापासून समाजाला वाळवीसारखी पोकळ बनवणारी सामाजिक दुष्कृत्ये, भेदभाव आणि विषमता संपविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक म्हणून दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. मानवी हक्क आणि जगात पसरलेली असमानता यांच्यामध्ये समाजातील संधी आणि विशेषाधिकारांच्या वितरणात न्याय प्रस्थापित करणे, हे सामाजिक न्यायाच्या कक्षेत येते. लोकांना सामाजिक न्यायाच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी, संयुक्त राष्ट्रसंघ दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी जागतिक सामाजिक न्याय दिवस साजरा करते. प्रयत्नांना गती देणे आवश्यक आहे. सत्य हे आहे की, आपण अजूनही सामाजिक न्यायाशी संबंधित असलेल्या लक्ष्यित उद्दिष्टापासून खूप दूर आहोत. समाजातील प्रत्येक घटकातील प्रत्येक व्यक्ती भय, शोषण, अन्याय, भेदभाव यापासून मुक्त होईल, तेव्हा सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे वास्तवात रूपांतर होईल. त्याला चांगली उपजीविका आणि सामाजिक सुरक्षा मिळेल. हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा आपण समाजाला प्रेरणा देण्यासाठी आपल्या सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांना गती देऊ.

आपल्या परस्परसंबंधित जगात, सर्व व्यक्तींसाठी समानता, निष्पक्षता आणि सन्मान सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक न्यायाचा पाठपुरावा हे सर्वोच्च तत्त्व आहे. या प्रयत्नाचे महत्त्व ओळखून, आंतरराष्ट्रीय समुदायाने यंदा २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन २०२४ म्हणून नियुक्त केला. हा वार्षिक उत्सव भेदभाव, गरिबी, असमानता आणि जागतिक स्तरावर कायम असलेल्या इतर सामाजिक अन्यायांविरुद्ध सुरू असलेल्या संघर्षांची एक मार्मिक आठवण म्हणून काम करतो. जागतिक सामाजिक न्याय दिन, दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, सामाजिक न्यायाचा प्रचार आणि जगभरातील गरिबी, असमानता आणि भेदभाव यासारख्या समस्यांचे निराकरण करण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो. सामाजिक न्याय हे एक मूलभूत तत्त्व आहे जे शांततापूर्ण आणि समृद्ध समाजांना आधार देते, जिथे प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, संधी आणि संसाधनांमध्ये प्रवेश असतो. हा निबंध जागतिक सामाजिक न्याय दिनाचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे, आव्हाने आणि अधिक समान आणि न्याय्य समाजाला चालना देण्यासाठी सामूहिक कृतीची अत्यावश्यक गरज याविषयी माहिती देतो. ऐतिहासिक संदर्भ असे- जागतिक सामाजिक न्याय दिनाची स्थापना संयुक्त राष्ट्र महासभेने सन २००७मध्ये केली होती, ज्याचा उद्देश गरिबी, बहिष्कार, लैंगिक असमानता, बेरोजगारी आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांसारख्या समस्यांना तोंड देण्याच्या प्रयत्नांना चालना देण्याच्या उद्देशाने आहे. सामाजिक न्यायाच्या तत्त्वांमध्ये रुजलेला, हा दिवस पद्धतशीर असमानता दूर करण्यासाठी आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाची वचनबद्धता अधोरेखित करतो. नागरी हक्क चळवळ, कामगार चळवळ आणि लैंगिक समानतेसाठीच्या संघर्षासह, इतिहासातील विविध सामाजिक न्याय चळवळींमधून ते प्रेरणा घेते.

सामाजिक न्याय काय आहे? तर आधुनिक समाजात सर्व लोकांना समान संधी आणि सुविधा मिळायला हव्यात, हा केवळ सामाजिक न्यायाचाच नव्हे तर, सर्व देशांचा आदर्श आहे. सामाजिक न्यायाचे ध्येय हे सुनिश्चित करणे आहे की, सर्व लोक त्यांच्या सामाजिक भूमिका पार पाडू शकतील आणि समाजाकडून ते पात्र आहेत. यासाठी समाजातील विविध संस्थांना अधिकार व कर्तव्ये दिली जातात जेणेकरून ही उद्दिष्टे साध्य करता येतील.

कधीपासून साजरा केला जातो हा दिवस? तर दि.२६ नोव्हेंबर २००७ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जाहीर केले की, दरवर्षी २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जाईल. मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करताना अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे, हा त्याचा उद्देश आहे.

सदर दिन साजरा करण्यामागे उद्देश आहे- मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जागतिक सामाजिक न्याय दिन या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करताना अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे, हा त्याचा उद्देश आहे. याबाबत आपण समाजाला प्रेरणा देण्यासाठी आपल्या सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांना गती वाढवायला हवी. सन २०२२च्या जागतिक सामाजिक न्याय दिनाची थीम- औपचारिक रोजगाराद्वारे सामाजिक न्याय मिळवणे, ही होती. तर सन २०२१च्या जागतिक सामाजिक न्याय दिनाची थीम- डिजीटल अर्थव्यवस्थेतील सामाजिक न्यायासाठी आवाहन, ही होती. दैन्य, दारिद्र्य, जाती, धर्म, वर्ण, व्यवसाय किंवा जन्म यांवरून माणसामाणसांत भेदभाव होता कामा नये. प्रत्येकास सौजन्यपूर्ण वागणूक दिली गेली पाहिजे. तरच या दिनाचे महत्त्व अबाधित राहील.

!! जागतिक सामाजिक न्याय दिनाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली.**
**फक्त दूरभाष- ७७७५०४१०८६.**

# गर्जा महाराष्ट्र माझा कलाविष्काराच्या माध्यमातून महाराष्ट्राची परंपरा व संस्कृतीचे घडले दर्शन

## बल्लारपूर महासंस्कृती महोत्सव



**चंद्रपूर**-जात्यावरच्या ओव्या, भूपाळी, भारुड, गवळण,मंगळागौर यातून महाराष्ट्राची संस्कृती,मराठी माणसाची दिनचर्या तसेच महाराष्ट्रात साजरे केले जाणारे विविध सणसमारंभ व उत्सवाची झलक गर्जा महाराष्ट्र माझा या कलाविष्कारातून सादर करण्यात आली. या माध्यमातून महाराष्ट्राची परंपरा व संस्कृतीचे दर्शन घडले. औचित्य होते बल्लारपूर,महासंस्कृती महोत्सवाचे. स्थानिक कलाकारांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गर्जा महाराष्ट्र माझा कलाविष्कार तसेच वाघनृत्य,शिवमहिमा,गीत,संगीत आणि नृत्याविष्कार सादर करुन बल्लारपूरकरांची मने जिंकली. बल्लारपूर महासंस्कृती महोत्सव कार्यक्रमात यामुळे उत्तरोत्तर रंगत येत गेली.

यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे,मनपा आयुक्त विपिन पालीवाल,ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगांवकर,बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे,तहसीलदार ओमकार ठाकरे,चंदनसिंह चंदेल आदी उपस्थित होते.

बल्लारपूर शहराला ६०० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने सांस्कृतिक कार्य संचालनालय,जिल्हा प्रशासन आणि बल्लारपूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने,बल्लारपूर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सर्वप्रथम सतीश कणकम यांनी साकारलेले जय शिवराय वाघनृत्य सादर करण्यात आले. त्यानंतर नवरंग डान्स अकॅडमी मार्फत गणेश जन्म,शिवतांडव,शिव अघोरी नृत्य आदीवर आधारित शिवमहिमा सादर करण्यात आले. तसेच स्पार्क जनविकास फाउंडेशन,चंद्रपूर निर्मित गर्जा महाराष्ट्र माझा या कलाविष्कारातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. नवोदित कलावंताना व्यासपीठ मिळावे या उद्देशातून गर्जा महाराष्ट्र माझा कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. सुमारे १०० कलावंतांच्या या संचामध्ये सहा महिन्याच्या बालकपासून ७० वर्ष वयाचे कलावंत आहेत.या कलाविष्काराचे दिग्दर्शन प्रज्ञा जिवनकर,संकल्पना आनंद आंबेकर तर मार्गदर्शन संजय वैद्य व गोलू बारहाते यांचे लाभले.

# खासदार डॉ.प्रितमताई यांच्या वाढदिवसा निमित्त मतिमंद, मूकबधिर व अस्थीव्यंग निवासी शाळेमध्ये भोजन कार्यक्रम संपन्न



**पाटोदा । प्रतिनिधी**

दिनांक-१७ फेब्रुवारी रोजी बीड जिल्ह्याच्या खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवसा निमित्त तांबाराजुरी तालुका पाटोदा जिल्हा बीड येथील मतिमंद, मूकबधिर व अस्थीव्यंग निवासी शाळेमध्ये भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पाटोदा नगर पंचायतच्या नगरसेविका सौ.जयश्रीताई सुशील कोठेकर, तांबा राजुरी ग्राम पंचायतच्या उपसरपंच सौ. सीमाताई तांबे, संस्थेचे सचिव मा.विठ्ठलरावजी तांबे सर, मुख्याध्यापक शिवाजीराव खामकर सर, दैनिक झुंजार नेताचे पत्रकार विजय जाधव, बाबासाहेब मुळे पाटील यांच्या उपस्थितीत स्नेह भोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. डॉ.प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांनी संपूर्ण जिल्ह्यामध्ये रेल्वे ताई म्हणून ओळख निर्माण केली तसेच जिल्ह्यातील विविध प्रश्न सातत्याने सोडविण्याचे प्रयत्न केले. कोविड काळात देखील गोरगरीब, वंचित रुग्णांसाठी खूप मोठ्या प्रमाणावर योगदान दिलेले बीड जिल्ह्यातील जनता कदापीही विसरू शकणार नाही. तसेच दिव्यांगासाठी आवश्यक उपयोगी असे साहित्य मोठ्या प्रमाणावर ताईच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. ताई साहेबांना उदंड आयुष्य, सुख, समृद्धी लाभो तसेच आगामी-२०२४ च्या केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये डॉ.प्रितमताई मुंडे या मंत्रीपदी विराजमान होवोत अशा प्रकारच्या शुभेच्छा अँड.सुशील कोठेकर यांनी दिल्या. या प्रसंगी मूकबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग या सर्व विद्यार्थ्यांना तसेच संस्थेचे संपूर्ण कर्मचारी वृंद यांच्या सोबत सर्व प्रमुख पाहुण्यांनी देखील स्नेहभोजन कार्यक्रमात सहभागी घेतला.

# रड्डेच्या माळरानावर अनुभवला बैलगाडी शर्यतीचा थरार



**मंगळवेढा :** स्व.आ.भारत भालके यांच्या ६२ व्या जयंतीनिमित्त भालके फाउंडेशनच्या मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील रड्डेच्या माळरानावर पहिल्यांदाच बैलगाडा व म्हशी पळवण्याचा थरार या भागातील नागरिकांनी अनुभवला या स्पर्धेसाठी या भागातील नागरिकांनी प्रचंड गर्दी केली.

लोकनेते स्व. भारत भालके फाउंडेशन यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, स्पर्धेसाठी अ गट,ब गट, दुसा चौस, आदत आणि घोडागाडी अशी विभागणी करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन दामाजी कारखान्याचे उपाध्यक्ष तानाजी खरात यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी चंद्रभागा कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित जगताप, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भारत बेदरे, दामाजीचे संचालक दयानंद सोनगे, सुरेश कोळेकर, व्यंकट भालके दत्तात्रेय चौगुले पैलवान ज्ञानेश्वर भगरे वसंत गरंडे, दादा दौलतोडे,दादा गरंडे,नामदेव जानकर,नितीन पाटील, गुलाब थोरबोले,दौलत माने, राजाराम बाबर ,अजित यादव आदीसह बैलगाडा शर्यतीसाठी आलेले स्पर्धक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना भगीरथ भालके म्हणाले की पारंपारिक खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी म्हशी पळवण्याच्या व बैलगाडी शर्यतीचे आयोजन लोकनेते भारत भालके फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले या स्पर्धेच्या माध्यमातून विजेता होण्यासाठी ज्या पद्धतीने धुराळा निघणार आहे, तशाच पद्धतीचा धुराळा यापुढील काळात होणाऱ्या निवडणुकीत उडवण्याचे आवाहन केले. घोडागाडी मध्ये महेश कल्ले कागल यांनी प्रथम क्रमांक मिळवला. स्पर्धेसाठी गुलाब थोरबोले, अशोक माने, परमेश्वर लेंडवे, विकास पुजारी, दत्ता मोठे,संजय लोखंडे,दत्तात्रय चोपडे यांनी परिश्रम घेतले.

# मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांचा शेततळे घेण्याकडे कल, शेततळ्यामुळे फळबागांचे क्षेत्र विस्तारले



**मोहोळ :** उन्हाळ्यात ही बागायत व्हावे, उत्पादन वाढावे व पाणी टंचाईवर मात करण्यासाठी मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांचा शेततळे घेण्याकडे वाढता कल आहे. शेततळ्या मुळे विविध फळबागांची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे.तालुक्यात २ हजार १०० एकरावर फळबागांची लागवड झाली आहे. निसर्गाची लहरीपणा, वेळेवर न पडणारा पाऊस यामुळे उसासारखी जादा पाण्याची पिके घेणे अडचणीचे होत आहे. शेततळ्या अगोदर पिकांना पाणी देण्यासाठी विहिरी व बोअर यांचा वापर केला जात होता.आजही तो सुरू आहेच. मात्र उन्हाळा सुरू झाला की विहीर व बोअर ची पाणी पातळी खालावते त्यामुळे शेती बागायती करण्यावर मर्यादा येत असे. मात्र या अडचणीवर मात म्हणून शेतकऱ्यांनी शासकीय योजनेतून तसेच काहींनी स्वखर्चाने शेततळी खोदली आहेत.मोहोळ तालुक्यात एकूण एक हजार ५५८ शेततळी आहेत. त्या माध्यमातून ९ हजार ३४८ टीसीएम पाणीसाठा झाला आहे. शेततळी विविध आकारात आहेत. त्यामुळे त्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठा होतो आहे.उजनी कालव्याला पाणी आल्यावर अनेक शेतकऱ्यांनी शेततळी भरून घेतली आहेत, तर अनेक शेतकरी विहिरीचे व बोअरचे पाणी शेततळ्यात सोडतात. जमिनीत पाणी मुरू नये यासाठी शेततळ्यात अनुदान पद्धतीवर प्लॅस्टिक कागद टाकण्याची ही सोय आहे.एकदा शेततळे भरले की पावसाळ्या पर्यंत फळबागा ठिबक सिंचन व तुषार सिंचनाच्या माध्यमातून जिवंत ठेवण्यास मदत होते. त्यामुळे उत्पादनात वाढ होते. एकूण ३३१ शेतकऱ्यांनी फळबागांची लागवड केली आहे. त्यात केळी, डाळिंब, पेरू यांचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे. सध्या फळबाग लागवडीसाठी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना शेतकऱ्यांना सोयीची आहे.शेतकऱ्यांना पाण्याचे महत्व समजले आहे. त्यामुळे शेततळ्याच्या माध्यमातून तालुक्यात फळबागांचे क्षेत्र वाढीस लागले आहे. ठिबक व तुषार सिंचनाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होत नाही.

# रायगड लोकसभेची जागा आपलीच-अजित पवार

## सुनील तटकरेंच्या नावावर शिक्कामोर्तब, प्रचाराचा फोडला नारळ

**रायगड**-रायगडची जागा राष्ट्रवादी काँग्रेसलाच मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी स्पष्ट केले. म्हसळा येथील सभेत अजित पवार यांनी रायगड लोकसभा मतदारसंघ सुनील तटकरे यांचाच असल्याची घोषणा केली. याशिवाय कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे निर्देशही दिले. शनिवारी अजित पवार यांनी एकप्रकारे सुनील तटकरे यांच्या प्रचाराचा नारळच फोडला. त्यामुळे भाजपाने रायगडच्या जागेवर केलेला दावा, अजित पवार यांनी मोडीत काढला आहे.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मधुकर पाटील आदी उपस्थित होते. यावेळी अदिती तटकरे यांनी तहसील कार्यालयातील इमारत, नगरपंचायत इमारतीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली.या सभेत रायगड लोकसभेसाठी सुनील तटकरेच उमेदवार आहेत, कामाला लागा, असे सांगत अजित पवारांनी रायगड लोकसभेच्या वादावर पूर्णविराम दिला. त्याशिवाय यावेळी अजित पवारांनी मराठा आरक्षणावर महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी २० फेब्रुवारीला विशेष अधिवेशन भरवणार असल्याचेही सांगितले.यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यात सुरू असलेल्या मराठा आंदोलनावर योग्य भाष्य करत या आरक्षणासाठी मंत्री मंडळाकडून येत्या २० फेब्रुवारीला विशेष अधिवेशन भरवणार असून चर्चा झाल्यानंतर बहुमताच्या जोरावर मराठा आरक्षणाबत निर्णय घेतला जाईल असे अजित पवार म्हणाले.महायुतीचे सरकार सकारात्मकतेने काम करत आहे. मात्र काहींना झटपट निर्णय हवे असतात. अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. मागील आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकले नाही. घटनेच्या चौकटीत बसूनच देश चालतो. त्यामुळे कोणावरही अन्याय न करता इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्ही आराम देण्यासाठी प्रयत्नशील आहोत असेही अजित पवार म्हणाले.सुनील तटकरे यांनी छत्रपती शिवरायांच्या या भूमीत राष्ट्रवादी पक्ष वाढवला. त्यांना कार्यकर्त्यांनी बळ दिले म्हणून आज रायगडमध्ये आपल्या पक्षाची नाळ गावागावांत जोडली गेली आहे, असेही अजित पवार म्हणाले. यावेळी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे शहराध्यक्ष व नगरसेवक अनिकेत पानसरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.अजित पवार यावेळी पुढे म्हणाले, ''मला राज्यातील प्रश्न सोडवून विकास करायचा आहे. तसेच जनतेच्या मनातील निर्णय घेण्याचा प्रयत्न आहे. देशपातळीवर मोदींसारखे नेते नाहीत. विरोधक सैरभैर झाल्यासारखे पळत आहेत. मागील काही काळात वेदना देणाऱ्या गोष्टी झाल्या मात्र आता राष्ट्रवादी हा पक्ष शेतकरी, कामगार, युवा यांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत राहणार'', असे अजित पवार म्हणाले.



# महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन व दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

## विद्यार्थ्यांनो लक्षात ठेवा शिक्षणामुळेच आपले भविष्य घडते-मधुकरजी धस

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील शिक्षण क्षेत्रामध्ये नावलौकिक असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन व इयत्ता दहावी,बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम शनिवार दि.१७ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयामध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मधुकरजी धस सर तर प्रमुख अतिथी म्हणून वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अनिलदादा चोले तसेच वडवणी मार्केट कमिटीचे संचालक पांडुरंगजी अंडील,बालरोगतज्ञ डॉ.गुरुदत्त महादर,वडवणी मार्केट कमिटीचे संचालक रंजीत भैय्या धस,संस्थेच्या संचालिका सौ.जिजाबाई धस,महावितरण कार्यकारी अभियंता सौ.स्मितताई आंधळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,आदर्श शिक्षिका श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम आदी मान्यवर म्हणून उपस्थित होते.





मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली मान्यवरांचे व उपस्थितांचे स्वागत गीत गाऊन स्वागत करण्यात आले. स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापिका कु.चंदनशिव प्रिया,उपमुख्याध्यापिका कु.थोरात खुशी,पर्यवेक्षीका कु.चव्हाण दिव्या,शिक्षिका कु.आंधळे आदिती यांनी आपले स्वयंशासन दिनाचे अनुभव सांगितले तर कुमारी दराडे शामल,कु.चोले रंजना,कु.तंबूड प्रतीक्षा यांनी शाळेतील अनुभव सांगितले की शाळेने आम्हाला भरभरून ज्ञान देण्याचं काम केलं ती शाळा सोडून जाताना मनघेवरून येत आहे असे अनुभव व्यक्त केले तर मान्यवरांच्या शुभहस्ते दैनिक प्रभावती नगरी वृत्तपत्रातील बातमीची प्रतिमा ज्ञानसंस्कार बालशिक्षण केंद्राचे संचालक श्री.विष्णू आंधळे सर यांना भेट दिली त्यांनी निरोप समारंभ बद्दलचे विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या तर अध्यक्षीय समारोपर विचार व्यक्त करताना मधुकरजी धस सर यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी हे कसे घडले आपण सुद्धा मेहनत,जिद्द,चिकाटी प्रयत्न केल्यास स्वतःचे,आई-वडिलांचे स्वप्न साकार करू शकतात मन लावून अभ्यास करा आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचा शिक्षणामुळेच आपलं भविष्य घडते असे विचार व्यक्त करून दहावी,बारावी बोर्ड परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.चंदना कापले, कु.आकांक्षा गावडे या विद्यार्थिनींनी केले तर कार्यक्रमाचे आभार संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी मानले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्त कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शिवसेना शहर प्रमुखपदी अनिल जाधव यांच्या निवडी मूळे निष्ठावंत शिव सैनिका मध्ये नव चैतन्य

## फटाक्याच्या अतिषबाजीने मानवत शहर दूमदूमले

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत शिवसेना शहरप्रमुखपदी अनिल जाधव यांची पक्षप्रमूख मा. श्री, उध्दवजी ठाकरे यांच्या आदेशावरून निवड करण्यात आली. निवडीची वार्ता कळताच शिवसेनिकामध्ये नवचैतण्य निर्माण झाले असून अनिल जाधव यांच्या निवडीमूळे निष्ठावान शिवसैनिकांना न्याय मिळाला असल्याचे मत शिव सैनिकातून व्यक्त केल्या जात आहे.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाशी निष्ठावंत व शिवसेना उपनेते खा.संजय जाधव यांचे अत्यंत विश्वासू असलेले. श्री आनिल जाधव यांची पुन्हा एकदा शिवसेना मानवत शहरप्रमुखपदी निवड झाली असून. या पूर्वी अनिल जाधव यांनी १९ फेब्रुवारी २०११ रोजी मानवत शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यान त्यांच्या एका वर्षाच्या मानवत शहरप्रमुखाच्या कार्यकाळात अनिल जाधव यांनी पक्षासाठी उल्लेखनीय अनेक कार्य केले. त्यामध्ये त्यांनी आंदोलन, मोर्चे, रस्ता रोखो, उपोषणे, रक्दान शिबीरे, पाणपोई तसेच कोरोना काळात कोविड मदत केंन्द्रा द्वारे अनेक रूग्नांना रूग्ण वाहीका व बेड उपलब्ध करुन दिले, रूग्णांना फळे व आयूर्वेदीक काढा ईत्यादिंचे वाटप केले त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून समाज हिताची कामे पार पाडली. शिव सेना पक्षावर असणारी निष्ठा व कार्य करण्याची कूशलता आणि अनिल जाधव यांचा मानवत शहर व मानवत तालुक्यातील पंचकोशित दांडगा संपर्क असल्यामूळे शिवसेनेच्या वतीने सच्चा शिवसैनिक अनिल जाधव यांची शिवसेना मानवत शहरप्रमुखपदी निवड केली.त्यांच्या या निवडी बद्दल अनिल जाधव यांचे अभिनंदन शिवसेनेचे उपनेते परभणी लोकसभा मतदार संघाचे शिवसेनेचे खा.संजय जाधव,आमदार श्री, राहुल पाटिल, माजी आमदार सौ.मिराताई कल्याणराव रेंगे पाटील , परभणी जिल्हा सहसंपर्क प्रमुख डॉ. प्रा.पंढरीनाथ धोंडगे यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकारी यांनी केले.

# ट्रेलरच्या धडकेत महिला ठार तर एक जण जखमी

**जिंतूर । प्रतिनिधी**

परभणी रस्त्यावरील साई मैदाना समोर ट्रेलरने दुचाकीला धडक दिली या मध्ये दुचाकी स्वार पती पत्नी गंभीर जखमी झाले पत्नीची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेताना रस्त्यातच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवार १८ फेब्रुवारी रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली.

या बाबत अधिक माहिती अशी की शहरातील परभणी रस्त्यावर साई मैदाना समोर ट्रेलर क्रमांक एम एच ४३ यु ४३३२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून रस्त्यावरून जात असलेल्या दुचाकी क्रमांक एम एच ३८ वाय ६४९४ ला जोरदार धडक दिली यात दुचाकीस्वार भानुदास नामदेव ठाकरे वय ५१ वर्ष,रेणुका भानुदास ठाकरे वय ४६ दोघे रा रामेश्वर हे गंभीर जखमी झाले त्यांना संभाजी



ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काजळे सहकारी सतीश ठोंबरे,संतोष शिंदे यांनी ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले तिथे डॉ.देविदास गरड यांनी प्राथमिक उपचार केले रेणुका ठाकरे यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेत असतांना रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

# रामेश्वर बचाटे पाटील यांच्या सामाजिक कार्याचा पोलीस प्रशासनाकडून गौरव

**सोनपेठ । प्रतिनिधी**

सामाजिक कार्याचा ध्यास घेऊन सतत समाज कार्य करण्यासाठी तत्पर राहणारे श्री. रामेश्वर बचाटे पाटील यांचा आज परभणी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. रवींद्रसिंह परदेशी यांच्याकडून सन्मान करण्यात आला.आजच्या काळात बरेच लोक स्वार्थ,राजकारण या गोष्टीच्या मागे पडत असतात पण याला अपवाद वडगाव स्टे.येथील श्री रामेश्वर बचाटे पाटील आहेत.ते सतत समाज कार्य करण्यासाठी अग्रेसर असतात यामध्ये त्यांचा कुठलाही स्वार्थ नसतो किंवा कसलेही राजकारण नसते. अडचणीतील लोकांना मदत कशी करता येईल असा ते नेहमी विचार करतात. तसेच पोलीस प्रशासनाला नेहमी सहकार्य करण्याची भावना त्यांची राहिलेली आहे यातूनच जेव्हा गरज आहे तेव्हा ते पोलीस प्रशासनाच्या मदतीला धावून जातात. या सर्व कार्याची दखल घेऊन एक कौतुकाची थाप परभणी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.रवींद्रसिंह परदेशी यांनी रामेश्वर बचाटे पाटील यांचा सत्कार




करून केली व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा ही दिल्या. गंगाखेड येथे शांतता समितीची बैठक पार पडली या बैठकीसाठी परभणी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.रविंद्र सिंह परदेशी , अप्पर पोलीस अधीक्षक श्री.यशवंत काळे साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे , तसेच पोलीस निरीक्षक श्री.दीपक कुमार वाघमारे आदी उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत रामेश्वर बचाटे पाटील यांचा सन्मान झाल्यामुळे त्यांना आपले समाजकार्य करत राहण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली.

# डॉ.झाकेर हुसेन शाळेच्या वतीने बक्षीस वितरण व पालक सभेचे आयोजन

**सेलू । प्रतिनिधी**

शहरातील डॉ झाकेर हुसेन प्राथमिक शाळेच्या वतीने आज दिनांक १७ फेब्रुवारी शनिवार रोजी सेलू शहरातील माशा अल्लाह फंक्शन हॉल येथे शाळेच्या वतीने आयोजित विवीध स्पर्धेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मदिना मस्जिदचे ईमाम मौलाना शेख रईस कासमी उर्फ ख्वाजा मौलाना होते, तर प्रमुख उपस्थितीत सय्यद इसाक मामू, राहत बँकेचे व्यवस्थापक मोहम्मद जलील , पत्रकार अबरार बेग, मुस्तफा खान, शेख जुबेर सह आदींची उपस्थिती रोशन जहाँ बाजी यांनी कार्यक्रमाचा उद्देशाचे सादरीकरण केले.सालेहा बाजी यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या योग्य प्रशिक्षणाबाबत सूचना केल्या.सना बाजी यांनी पालकांनी इंग्रजी व मराठीवर विशेष लक्ष देण्याची विनंती केली.मुस्तफा खान यांनी गणित विषयावर सविस्तर



विवेचन केले. गणितातील समस्या आणि त्यांचे निराकरण केले डॉ. झाकेर हुसेन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद अब्दुल अलीम सोफी सर यांनी पालकांना संबोधित करताना सांगितले की आगामी काळात नवीन शैक्षणिक वर्षात, इयत्ता सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेशच्या रुपात बुरखा दिला जाईल. शिलाई मशीन क्लासेस, सह मेहंदी डिझाईन क्लासेसची सुरुवात करण्यात येणार आहे कार्यक्रमात मोठ्या संख्येने पालक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक एम.ए.सलीम , मुहम्मद लाईख , शेख अहमद, शेख रिजवान, इर्शाद खान, सय्यद हमीद भाई, सय्यद साबेर, माजिद खान,हाफिज जुनैद यांनी परिश्रम घेतले.

# जगद्गुरु नरेंद्र महाराज पादुकांची जिंतूर येथे सवाद्य मिरवणूक

**जिंतूर । प्रतिनिधी**

जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा प्रवचन व पादुका दर्शन सोहळा गुरुवार १५ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या पादुका दर्शनाच्या अभूतपूर्व सोहळ्याने भाविकांच्या डोळ्याचे पारणे फिटले याबाबत अधिक माहिती अशी की, जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्यासाठी एक दिवस लिंबाजीराव गायकवाड यांच्या निवासस्थानी मुक्कामी आगमन झाले.शहरातील नगरेश्वर मंदिर येथे श्री ची पूजा करून रथामध्ये विराजमान झाल्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमांमध्ये वारकरी संप्रदायाचे भजनी मंडळ तसेच लेझीम पथक भगवा ध्वजधारी महिला कलशधारी महिला ढोल ताशाच्या गजरामध्ये मिरवणुकीला शहरात सुरुवात होऊन राधाकृष्ण मंगल कार्यालय मध्ये संस्थान तर्फे अनेक उपक्रम संस्थांतर्फे राबवण्यात आले यामध्ये रक्तदान शिबिराचे हि आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाविकांनी नरेंद्राचार्य यांच्या सिद्ध पादुकांचे पूजन शास्त्रोक्त मंत्रोच्चाराने करण्यात आले. त्यानंतर नरेंद्राचार्य लिखित 'लीलामृत' ग्रंथाच्या नवव्या अध्यायाचे सामुदायिक पारायण करण्यात आले. यावेळी नवीन साधकांना श्रींच्या असते साधक दीक्षा देण्यात येऊन महाआरतीने सोहळ्याची सांगता करण्यात आली.भाविकांसाठी ऑनलाइन प्रवचनजगदगुरू श्री नरेंद्राचार्य महाराज यांच्या अमृतवाणीचा शेकडो भक्तांनी ऑनलाइन लाभ घेतला. सदगुरुंची सेवा केली, तर इष्ट फळ प्राप्त होते, देवाअगोदर गुरुंना भजावे. गुरू अंधकारातून मनुष्याला बाहेर काढतो. आत्ममुक्तीची जाणीव सद्गुरुमुळे होते म्हणून सद्गुरुंची सेवा करताना गुरुविषयी मनात शंका नसावी, असेही त्यांनी शेवटी सांगितले.

याप्रसंगी भाविकभक्तांना उपासक दीक्षा देण्यात आली त्यानंतर प्रवचन व भव्य महाआरती करण्यात



आली कार्यक्रम स्थळी सर्व भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने जिल्ह्यातील व लगतच्या जिल्ह्यातील हजारोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते,यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधर बोर्डीकर यांना माऊली ची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला तसेच गणेशरावजी काजळे, मराठवाडा पिठाचे व्यवस्थापक प्रवीण गायकवाड, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाबासाहेब नायकल , प्रोटोकॉल अधिकारी शिवाजीराव पाटील , शेषराव मामा चव्हाण , परभणी जिल्हा निरीक्षक गोपीनाथराव जंगले , परभणी जिल्हा अध्यक्ष शामराव मुलगीर ,लिंबाजीराव गायकवाड जिल्हा सचिव माधवराव भोसले, गणेशराव भोबे ,जिंतूर तालुका अध्यक्ष सुभाषराव दळवे प्रवीण शहाणे ,सोपानराव रोकडे, आत्मारामजी घुले अण्णा, ह भ प वैजनाथ गरड महाराज, सुभाषराव राठोड, रामकृष्ण टाके, गजानन रोकडे, अंकुश रोकडे, ज्ञानेश्वर भामटे ,बापू भोंबे ,प्रल्हादराव काजळे ,संतोष दळवे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील गुरुबंधू गुरु भगिनी व भाविक भक्त राधाकृष्ण मंगल कार्यालय येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

### कमलापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूप पालटनार

# ७ कोटींच्या निधीतून होणार नूतन इमारतीचे बांधकाम

## मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्याहस्ते भूमिपूजन

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कमलापूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जीर्ण इमारतीत रुग्णांची गैरसोय होत असल्याने परिसरातील दूरवरच्या भागातील आदिवासी बांधवांना सुसज्ज इमारतीतुन योग्य उपचार मिळावा या उदात्त हेतूने राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी प्रयत्न करून तब्बल ७ कोटी रुपयांची निधी खेचून आणला.नुकतेच येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतन इमारत बांधकामाचे त्यांच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आले.त्यामुळे आता कमलापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूप पालटनार आहे.

अहेरी तालुक्यातील अतिदुर्गम व आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त म्हणून कमलापूरची ओळख आहे.या परिसरात असंख्य खेड्यांचा समावेश असून या भागातील आदिवासी बांधवांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून १९८० मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात आली होती. ही इमारत अक्षरशः मोडकळीस गेली होती.जीर्ण अवस्थेत असलेल्या इमारतीतूनच रुग्णांवर उपचार केले जात होते.त्यामुळे मागील काही वर्षांपासून नूतन इमारत बांधकाम करण्याची मागणी केली जात होती.मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी या बाबीची दखल घेऊन येथील नूतन इमारत बांधकामासाठी तब्बल ७ कोटी रुपयांची निधी खेचून आणला. तब्बल ४४ वर्षानंतर या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतन इमारतीचे बांधकाम केले जाणार असल्याने आता या भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाल्याने उदघाटन प्रसंगी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे गावात आगमन होताच त्यांचे ढोल ताश्यांच्या गजरात पुष्पगुच्छ देऊन गावकरांनी स्वागत करून आभार देखील मानले.भूमिपूजन प्रसंगी माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम,माजी प स सदस्य हर्षवर्धन बाबा आत्राम,राकॉचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर,जेष्ठ कार्यकर्ते श्रीकांत मद्दीवार,सामाजिक कार्यकर्ते अरुण मुक्कावार,तालुका आरोग्य अधिकारी डॉ किरण वानखेडे,डॉ राजेश मानकर,माजी उपसरपंच शंकर आत्राम,विद्यमान उपसरपंच सचिन ओलेटीवार,श्रीधर दुग्गीरालापाटीवार, कृष्णा कीर्तीवार, सतीश दैदावार,संदीप रेपालवार, विनोद ओलेटीवार,वेंकटी उलेंदला, स्नेहदीप आत्राम तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**या भागातील नागरिकांना मिळणार लाभ**

"कमलापूर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत रेपणपल्ली,दामरंचा, भंगारमपेठा, कोरेपल्ली,छलेवाडा ,गुडीगुडम,मोसम, मांड्रा, खांदला ९ उपकेंद्र आणि राजाराम येथील १ आरोग्य पथक समाविष्ट असून या प्राथमिक आरोग्य केंद्राची एकूण लोकसंख्या १९ हजार ४२६ एवढी आहे.उपकेंद्रात रुग्णांवर योग्य उपचार न झाल्यास कमलापूर प्राथमिक आरोग्य केंद्र गाठावे लागते.एवढेच नव्हेतर परिसरातील रुग्ण,आश्रम शाळेतील विध्यार्थ्यांमुळे या ठिकाणी ओपीडी व्यतिरिक्त २४ तास उपचार केले जाते.सुसज्ज इमारत झाल्यास या भागातील रुग्णांना लाभ मिळणार आहे.

# आर.के .कनिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय रंगलाल केजडीवाल कनिष्ठ महाविद्यालयात शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यांप्रसंगी संस्थेतील पूर्व माध्यमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व पदाधिकारी, शिक्षक -बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे प्राचार्य संजय सहारे होते . प्रमुख उपस्थिती उपमुख्याध्यापिका श्रीमती माया वंडलकर ,पर्यवेक्षक गणेशराव इंगळे , लालबहादूर यादव , उपप्राचार्य सुनिल भोयर तसेच अंशतः अनुदानित चे प्रमुख



जितेंद्र वर्मा उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यासोबत राज्य गीताचे गायन कु. रिद्धी भोयर यांनी केले. यावेळी शिवाजी महाराजांच्या जीवनावर लालबहादूर यादव यांनी कविता सादर केली . गणेशराव इंगळे ,माया वंडलकर, सुनिल भोयर ,संजय सहारे यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर समायोजित प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन किशोर राऊत तर आभार प्रदर्शन वैशाली भोयर यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराज शोभायात्रा समितीचे शिवरायांना अभिवादन

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय छत्रपती शिवाजी महाराज समितीने येथील टिळक चौकामध्ये सिंहासनाधीश्वर शिवरायांचा पुतळा मंचावर सुशोभित करून सजावट करीत शहरातील गणमान्य नागरिकांसोबत छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी पोलिस निरीक्षक प्रमोद बाणबले, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते, सामाजिक कार्यकर्ते नोमान अली बोहरा, बाबा बर्फानी ग्रुपचे अध्यक्ष राहूल काळे,

अजय जमनारे, पत्रकार बहादूर चौधरी, सावरिया मारोठीया,अविनाश भोपे,रवी केशरवाणी, अरविंद भार्गव,चंद्रकांत




पवार,छत्रपती मराठा मंडळाचे विजयराव खटके, मंगेश जगताप यांच्या हस्ते पुजन व माल्यार्पण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज शोभायात्रा समिती व साई सेवा दलाचे सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमानंतर शिवरायांच्या जयजयकार करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. शिवरायांची ललकारीही देण्यात आली.

# इंडियन मिलिटरी स्कूल येथे छत्रपति शिवाजी महाराज जयंती



**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव येथे हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्नल के एच पाटील तर प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक नितीन कोठे होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपति शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थांनी छत्रपति शिवाजी महाराज यांच्या पराक्रमावर व स्त्री आदर या विषयावर उत्कृष्ट भाषणं झाली.त्यानतंर प्रमुख पाहुणे नितीन कोठे यांनी छत्रपति शिवाजी महाराज म्हणजे पराक्रमाची पराकाष्ठा, एक उत्कृष्ठ व्यवस्थापक, पर स्त्री आदर शिकविणारे, सर्व धर्म समभाव शिकविणारे,एक आदर्श राजा या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच महाराजांनी दिलेली शिकवण आपण सर्वांनी अंगिकारावी ते आपले कर्तव्य आहे,असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. त्या नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्नल के एच पाटील यांनी इतिहासातील काही पराक्रमाचे घडलेले प्रसंग सांगून विध्यार्थ्यांना छत्रपति शिवाजी महाराज जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या. कार्क्रमाचे संचालन समर्थ गायकवाड , तर आभाप्रदर्शन प्रतीक फुलझेले या विद्यार्थ्याने कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# गोंडपिपरीत शिवजयंती उत्साहात साजरी



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती गोंडपिपरीत नगरपंचायत जवळ उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्ल्यार्पण करून उपस्थित नागरिकांना मिठाईचे वाटप करण्यात आले शिवगर्जनेचां जयघोष करण्यात आला.

उपस्थित मान्यवरांनी शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली.यावेळी शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडूरवार,कॉंग्रेस तालुका अध्यक्ष तुकाराम झाडे,उपनगराध्यक्ष सारिका मडावी,नगरसेवक यादव बांबोडे,शहर प्रमुख रियाज कुरेशी,तालुका संघटक शैलेश बैस,युवासेना तालुका प्रमुख तुकाराम सातपुते,युवासेना शहर प्रमुख विवेक राणा,तालुका उपसंघटक अशपाक कुरेशी,शहर उपसंघटक बब्बू पठान,बाजार समिती संचालक निलेश संगमवार,चेतन रा,शिकेश डेवगडे,रवी जांभूळकर,यादव झाडे यांच्यासह सर्वपक्षीय सामाजिक संघटनांचे पदाधिकारी शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगर परिषद कर्मचाऱ्यांना सर्वोतोपरी न्याय मिळवून देणार-विवेक बोढे

### नगर परिषद कर्मचाऱ्यांनी घेतली विवेक बोढे यांची भेट



**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील नगर परिषद कर्मचाऱ्यांनी रविवार, १८ फेब्रुवारी रोजी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांची भेट घेतली व आपल्या समस्या सांगितल्या. नगर परिषदेच्या समावेशनात काही कर्मचाऱ्यांना घेण्यात आले नाही. त्यामुळे नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांची भेट घेतली व आपल्या समस्या सांगितल्या याप्रसंगी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांना सर्वोतोपरी न्याय मिळवून देण्याची ग्वाही दिली.यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, माजी पं. स. उपसभापती निरीक्षण तांड्रा, माजी सरपंच संतोष नुने व नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

# मास्टर्स ऍथलेटिक्स स्पर्धेत मिलिटरी स्कूलचे प्रा.प्रवीण शेळके, आंतरराष्ट्रीय पातळीवर

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक इंडियन मिलिटरी स्कूल मधील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक प्रवीण शेळके यांचे ४४ व्या मास्टर्स स्पर्धेमध्ये पाच किलोमीटर वॉक प्रकारात भारतीय टीम मध्ये चयन झाले आहे. ते आता आंतरराष्ट्रीय पातळीवर ५ किमी वॉक या प्रकारात भारताचे प्रतिनधीत्व करणार आहेत..त्यांनी क्रीडा संकुल बालेवाडी पुणे या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी बजावत आंतरराष्ट्रीय पातळी गाठली.

४४ व्या मास्टर्स स्पर्धेमध्ये देशभरातून जम्मू काश्मीर पासून तर केरळ, कर्नाटकापर्यंत जवळपास संपूर्ण राज्यातील जवळपास ७०० स्पर्धकांनी वेगवेगळ्या मैदानी खेळ प्रकारात भाग घेतलेला होता. महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना प्राध्यापक शेळके यांनी पाच किलोमीटर वॉक या स्पर्धेमध्ये संपूर्ण देशातून पाचवा क्रमांक प्राप्त करीत भारताच्या सहा जणांच्या टीम मध्ये स्वतःचे स्थान निश्चित केले. येत्या ऑगस्टमध्ये स्वीडन राष्ट्रामध्ये होणाऱ्या मास्टर्स आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी ते आता जाणार आहेत.

प्रा. शेळके यांनी यापूर्वीही पर्वतारोहन क्षेत्रात इंडियन माऊंटनिरिंग फाउंडेशन, दिल्ली मार्फत आयोजित शिखर मोहिमेमध्ये भाग घेत ६००० मीटरच्या वर असलेले माउंट युनम आणि आणि माउंट चंद्रभागा १४ हे बर्फाच्छादित शिखर मायनस १७ डिग्री सेल्सिअस मध्ये सर केलेले आहेत.. शिक्षकी पेशा सांभाळत विद्यार्थ्यांना साहसी उपक्रमासाठी प्रेरणा देणे,त्याचप्रमाणे त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती आणि शारीरिक स्वास्थ्य याबद्दल जाणीव आणि जागृती निर्माण करणे साठी प्रा.शेळके विद्यार्थ्यांना प्रेरित करत असतात.




त्यांना मिळालेल्या या यशाबद्दल मिलिटरी स्कूलचे अध्यक्ष मनोज भेंडे, सचिव कृष्णा कडू, कमांडंट के एच पाटील,प्राचार्य रविकिरण भोजने ,ज्येष्ठ शिक्षक नितीन कोठे, त्याचप्रमाणे इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

# जगतगुरु नरेंद्रचार्य महाराज संस्थान आयोजित महारक्तदान शिबीर

**वरोरा । प्रतिनिधी**

अनंत श्री.विभूषित जगतगुरु रामानंदाचार्य श्री.स्वामी नरेंद्रचार्याजी महाराज यांच्या प्रेरणेने स्व-स्वरूप संप्रदाय तर्फे दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केले जाते. आपल्या महाराष्ट्रात सिकलसेल,अनेमिया, थलेसेमेशा, हिमोफिलिया,ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर पेशन्ट जास्त आढळतात.अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते.यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढ्याना रक्त देण्याचे सप्रदाया मार्फत निश्चित केले आहे.

त्याअनुषंगाने अनंत श्री. विभूषित जगतगुरु रामानंदाचार्या श्री.स्वामी नरेंद्रचार्याजी महाराज जगतगुरु रामानंदाचार्या दक्षिण पीठ,नानिजधाम (महाराष्ट्र)जगतगुरू नरेंद्रचार्य महाराज संस्थान आयोजित महारक्तदान शिबीर १० फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या दरम्यान रक्तदान शिबिर चंद्रपूर जिल्ह्यात घेण्यात येत असून १८ फेब्रुवारी२०२४ ला वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात घेण्यात आले.जीवणज्योती रक्तपेढी केंद्र नागपूरचे डॉ.सत्यसिंग ,डॉ. सचिन कासार,डॉ.प्राची परिहार,वीरांगना गउपाले,अंकुशा डोमले,नेहा माडेवार,गजानन तराळे,डॉ.स्वप्नील,डॉ.दिनेश



डोईफोडे या डॉक्टर चमुनी रक्तदात्यांच्या आरोग्याची योग्य तपासणी केली.जवळपास १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.रक्तदान शिबिराचे उदघाटन संतसंग चंद्रपूर जिल्हा महिला अध्यक्षा स्मिता श्रीधर लढी,प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश कमिटी,सामाजिक कार्यकर्ते छोटुभाई शेख,शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा)मुकेश जीवतोडे,संचालक-आविष्कार कॉन्सल्टन्सी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड चे प्रमुख मंगेश खंगार,आनंद नागरी बँक चंद्रपूर चे योगेश कातोरे,यांचे प्रमुख उपस्थितीत शिबिराचे उदघाटन पार पडले.शिबीर यशस्वीतेसाठी संतसंग चे वरोरा तालुका प्रमुख श्रीकांत पिंपलशेंडे,भद्रावती तालुका प्रमुख वंदना उईके,महिलाप्रमुख वरोरा माधुरी खंगार,संजीवनी प्रमुख ओंकार एकोणकार,गोवर्धन काळे,खांडेकर,आदि संतसंग पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.वरोरा तालुक्यातील मोखाळा,जामगाव,वरोरा,बोर्डा येथील मोठ्या प्रमाणात सतसंघ कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .